८०


# आयुक्त राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर, दुसरा माळा, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई – ४०० ०२३.

E.mail:excise_dycom_insp@mahaonline.gov.in Fax:22662370 Tel.22660163


विषय:- letsbuydrink.com या वेबसाईटद्वारे महाराष्ट्र राज्यात ऑनलाईन मद्य विक्री करणा-या कंपनीचा काळया यादीत समावेश करण्याबाबत.

## परिपत्रक

क्रमांक.डिईटी-११२०१४/९१७२/सात

मुंबई, दिनांक १० फेब्रुवारी, २०१५.

निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, मुंबई (शहर) यांनी गुन्हा क्र.३३/भपश-१/२०१४ यामध्ये महाराष्ट्र राज्यातील ऑनलाइन मद्य खरेदी/विक्रीबाबत अमित अजयकुमार गोयल यास आरोपी म्हणून घोषित केले आहे. सदर आरोपीच्या मालकीचा दिल्ली येथे रेड ऐलान डिस्ट्रीब्यूटर्स प्रा. लि. नावाचा होलसेल आयात/निर्यात मद्य विक्रीचा व्यवसाय आहे. विदेशी मद्य आयात करण्यासाठी त्यांच्याकडे केंद्र शासनाची अनुज्ञप्ती आहे. महाराष्ट्र राज्यात वेबसाईटद्वारे मद्याची खरेदी-विक्री व प्रसिध्दी करण्यास मुंबई दारुबंदी कायदा १९४९ कलम २४ प्रमाणे बंदी आहे. सदर अमित अजयकुमार गोयल हा आरोपी letsbuydrink.com अशी वेबसाईट तयार करुन याद्वारे मद्याच्या खरेदी विक्रीचे व्यवहार करीत आहे असे आढळून आल्यामुळे त्यांच्या विरुध्द मुंबई दारुबंदी कायदा १९४९ कलम ६५ (ए) (ई), २४, ८१, ८३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

म्हणून याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, श्री. अमित गोयल आणि त्यांच्या मालकीच्या मे. रेड ऐलान डिस्ट्रीब्यूटर्स प्रा. लि. या कंपनीचा मद्य खरेदी/विक्रीच्या व्यवहाराबाबत काळया यादीमध्ये (Black List) समावेश करण्यात येत आहे. सदर व्यक्तीचा अथवा कंपनीचा मद्य व्यवसायाशी संबंध आढळल्यास त्यास मज्जाव करण्यात यावा अथवा त्यास कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात येऊ नये. तसेच सदर व्यक्तीबरोबर आयात/निर्यात मद्य व्यवसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे व्यवहार करण्यात येऊ नयेत, असे सर्व अनुज्ञप्तीधारकांना कळविण्यांत यावे. तसेच या व्यक्तींशी किंवा त्यांच्या कंपनीशी ऑनलाईन मद्य खरेदी / विक्री व आयात/निर्यातीचा व्यवसाय केल्याचे आढळल्यास संबंधित अनुज्ञप्तीधारकाविरुध्द कारवाई करण्यात येईल.

२६/२

(एस. डी. शिंदे)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विभागीय उप-आयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क,
नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय
आवक क्रमांक 220
दिनांक 26/2/2015
विभाग

प्रति,

१. सर्व राजपत्रित अधिकारी.
२. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
३. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
४. या कार्यालयातील सर्व कार्यासने.

DDC नाशिक